**प्रस्तावना**

**विषय:- अंजूरफाटा ते तिरुपती हॉस्पिटल पर्यंतच्या रोडवरील, ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो-5 च्या कामात अडथळा होत आलेले पथदिवे व पोल एम.एम.आर.डी.ए. मार्फत काढण्यात आल्याने सदर रोडवर दोन्ही बाजूस नव्याने पथदिवे पुरविणे, बसविणे कार्यान्वित करणेकामी निविदा मंजुरी बाबत.**

अंजूरफाटा ते तिरुपती हॉस्पिटल पर्यंतच्या रोडवरील, ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो-5 च्या कामात अडथळा होत असलेले पथदिवे व पोल एम.एम.आर.डी.ए. मार्फत काढण्यात आल्याने सदर रोडवर दोन्ही बाजूस नव्याने 210 नग पथदिवे व पोल पुरविणे, बसविणे कार्यान्वित करणे कामी रुपये १,३१,११,०४९/- खर्चाच्या प्रस्तावास एम.एम.आर.डी.ए. कार्यालयाने मान्यता दिली आहे. महानगरपालिकेने सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक मान्यतेसह निविदा प्रक्रिया राबविणे व ठेकेदार निश्चित करुन त्याबाबतचा प्रगती अहवाल एम.एम.आर.डी. कडे सादर केल्यानंतर त्याबाबतची रक्कम महानगरपालिकेकडे सादर केली जाईल. असे मंजुरी पत्र क्र.MPIU/MLS/CA-28/BNCMC/Street light pole/2022/647 दि.13/09/2022 मध्ये नमुद आहे. त्यानुसार महानगरपालिकेने प्रशासकीय ठराव क्रमांक **43** दिनांक. **17/10/2022** नुसार सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रुपये 1,44,45,385/- खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकिय मान्यतेसह निविदा मागविणेस मा.प्रशासक तथा आयुक्त् सो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर कामी महाटेंडरवर टेंडर क्रमांक 849793 नुसार दिनांक 07/11/2022 ते 21/11/2022 या कालावधित ई निविदा मागविण्यात आल्या. प्राप्त् एकूण 4 निविदा पैकी परिपुर्ण निविदांची छाननी प्रक्रिया पूर्ण करुन पात्र तीन निविदाकार यांचे प्राईज बिड दिनांक 22/11/2022 रोजी उघडण्यात आले आहे. त्यानुसार निविदादरांचा तौलानिक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **निविदा धारकाचे नांव** | **अंदाजपत्रकिय रक्कम** | **प्राप्त् दर % कमी/जास्त्** | **निविदा खर्च** |
|---|---|---|---|---|
| 1 | मे. हायटेक कंन्स्ट्रक्शन ग्रुप, नवी मुंबई | रु. 1,44,45,385/- | 22.300 % कमी | रु. 1,12,24,064/- |
| 2 | मे. पदमजा इलेक्ट्रिकल्स्,ठाणे | | 15.500 % कमी | रु. 1,22,06,350/- |
| 3 | मे. आदित्य् इलेक्ट्रिकल्स्,ठाणे | | 11.810 % कमी | रु. 1,27,39,385/- |

वरील प्रमाणे निविदाकार मे. हायटेक कंन्स्ट्रक्शन ग्रुप, नवी मुंबई यांनी सादर केलेले निविदा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षा कमी आहेत व त्यानुसार रक्कम रुपये 1,12,24,064/- चे खर्च येत आहे व त्यास मा.निविदा समिती तसेच आयुक्त् सो. यांची मान्य्ता घेण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 452 (अ) नुसार मा.प्रशासक म्हणुन अधिकार आपणाकडे असल्याने

सदर कामाची सर्वात कमी दराची निविदा मे.हायटेक कंन्स्ट्रक्शन ग्रुप, नवी मुंबई यांचे सोबत म.म.अ. 1949 चे कलम 73(क) नुसार संविदा करणे तसेच आर्थिक मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

**ठराव क्रमांक** ६५ **दिनांक :-** २८/१२/२०२२

**विषय:- अंजूरफाटा ते तिरुपती हॉस्पिटल पर्यंतच्या रोडवरील, ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो-5 च्या कामात अडथळा होत आलेले पथदिवे व पोल एम.एम.आर.डी.ए. मार्फत काढण्यात आल्याने सदर रोडवर दोन्ही बाजूस नव्याने पथदिवे पुरविणे, बसविणे कार्यान्वित करणेकरिता संविदा करणे.**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडिल शासन आदेश क्र. एमसीओ 2020/प्रक्र 71(भाग-2)नवि-14, दिनांक 06/06/2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 452 (अ) तरतुदीनुसार मला प्राप्त् झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ प्रशासक तथा आयुक्त्, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सदर कामी प्र.कार्यकारी अभियंता(विद्युत), शहर अभियंता, मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी, अतिरीक्त् आयुक्त् यांनी शिफारस केल्यानुसार अंजूरफाटा ते तिरुपती हॉस्पिटल पर्यंतच्या रोडवरील, ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो-5 च्या कामात अडथळा होत आलेले पथदिवे व पोल एम.एम.आर.डी.ए. मार्फत काढण्यात आल्याने सदर रोडवर दोन्ही बाजूस नव्याने पथदिवे पुरविणे, बसविणे कार्यान्वित करणेकामी वरील प्राप्त् निविदेनुसार सर्वात कमी दराचे निविदाकार मे. हायटेक कंन्स्ट्रक्शन ग्रुप, नवी मुंबई यांचे सोबत म.म.अ. 1949 चे कलम 73(क) नुसार संविदा करणे व त्यानुसार येणाऱ्या रक्कम रुपये 1,12,24,064/- चे खर्चास आर्थिक मान्यता देत आहे.

**प्रशासक तथा आयुक्त्**

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**